[Date]

# कलस्सैकरांस

Colossians

# कलस्सैकरांस

## 1

1 पौल, जो परमेश्वरी इच्छेने येशू ख्रिस्तांचा प्रेषित आहे आणि भाऊ तीमथ्य यांच्याकडून, कलस्सैत राहणाऱ्या
ख्रिस्तांतील पवित्र आणि विश्वसनीय लोकास . 2 आपला स्वर्गीक पिता परमेश्वर यापासून तुम्हांला असीम कृपा आणि
शांति प्राप्त व्हावी.
3 आम्ही प्रभू येशू ख्रिस्त आणि त्याच्या पित्याचे आभार मानितो आणि तुमच्यासाठी विनंती करीत असतो. 4 सर्व पवित्र
लोकांसाठी असलेले तुमचे प्रेम आणि ख्रिस्त येशूंवरील तुमचा विश्वास यांविषयी आम्ही ऐकले आहे, 5 हे त्या आशेमुळे
आहे जी तुमच्याकरिता स्वर्गांत राखून ठेवलेली आहे. या आशेविषयी तुम्ही येशूवार्तेच्या सत्यवचनाद्वारे अगोदरच ऐकले
होते. 6 जे वचन आधी तुमच्यापर्यंत पोहचले, आणि जे नंतर इतर लोकांपर्यंतही पोहचले, त्याचा प्रभाव सर्व दुनियेला
दिसतो आहे. ज्या समयापासून तुम्ही ती ऐकली आणि खरोखरच परमेश्वरी दयेविषयी जाणून घेतले, त्या समयापासून ही
येशू-वार्ता तुम्हांमध्ये देखील आणखी वाढत चालली आहे. 7 या कृपेविषयी तुम्ही, आमचा सहकर्मी आणि विश्वासयोग्य
सेवक, एपफ्रास याच्यापासून एेकले होते. 8 पवित्र आत्म्याकरिताच्या तुमच्या प्रेमाविषयी त्याने आम्हांला सांगितले
आहे.
9 याच कारणास्तव, ज्या दिवसापासून त्याविषयी आम्ही ऐकले आहे, तुम्हांसंबंधी लालसा करण्यापासून थांबत (न
चुकता) नाहीये यासाठी, की पूर्ण ज्ञान आणि आध्यात्मिक समज (शहाणपण)असणारी जी येशूंच्या इच्छेची ओळख
आहे, त्यासंबंधी तुम्ही विपुल होत जावे. 10 तुमची चालचलणूक येशूंना प्रिय असणारी असावी, प्रत्येक चांगल्या कार्यात
तुम्ही फलदायी व्हावे आणि परमेश्वरी ज्ञानात अधिक वाढते होऊन त्याला एकूणएक गोष्टीत प्रसन्न करावे.
11 परमेश्वराच्या तेजोमय सामर्थ्याने मजबूत होऊन, आनंदाने पूर्ण सहनशक्तिने व धीराने स्वर्गीक पित्याचे आभार मानित
रहा, 12 परमेश्वर बापाची स्तुति- धन्यवाद करीत जा, ज्याने आपल्याला पवित्र लोकांसह प्रकाशात, वतनाचे भागीदार
होण्याजोगे केले. 13 परमेश्वरानेच आपल्याला अंधाराच्या तावडीतून सोडविले, आणि आपल्या प्रिय पुत्राच्या राज्यात
आणिले आहे; 14 ज्यामुळे आपल्या सर्वांना येशूंच्या रक्ताद्वारे स्वातंत्र्य (मुक्ति) किंवा अपराधांची क्षमा मिळालेली आहे.
15 ते अदृश्य यहोवाचे प्रतिरूप आहेत; आणि सर्व सृष्टीत सर्वश्रेष्ठ आहेत. 16 त्यांच्याद्वारेंच सर्व काही, ते स्वर्गातील
असो किंवा पृथ्वीवरील, दिसणारे असो किंवा न दिसणारे, मग ते राजासन किंवा राज्य किंवा अधिकार असलेले
सत्ताधीश किंवा सामर्थ्य असो, सर्व काही त्यांच्याद्वारेच आणि त्यांच्यासाठीच निर्माण झाले आहे. 17 ते सृष्टीच्या पूर्वी
होते आणि त्यांच्याद्वारेच सर्व काही सांभाळले जाते. 18 येशू देह अर्थात चर्चचे मस्तक आहेत, तेच प्रारंभ आणि
मेलेल्यांतून जिवंत उठणाऱ्यांतील प्रथम आहेत, ते अशासाठी की त्यांनी प्रत्येक बाबतीत सर्वांत सर्वश्रेष्ठ असावे.
19 यास्तव सर्व पूर्णता (वैपुल्याचा साठा) येशूंठायी वसावी असे स्वर्गीक पित्यास प्रिय (पसंतीस उतरले) वाटले.
20 आणि मग ते पृथ्वीवरील असो किंवा स्वर्गांतील, त्याने येशूंच्या क्रूसावर सांडलेल्या रक्ताद्वारें स्वतःबरोबर मेळ
(सख्य) घालून घेतला.
21 तुम्ही देखील पूर्वी आपल्या वाईट कार्यांद्वारें मनानें दुरावलेले आणि वैरी होता. 22 परंतु येशूंनी स्वत:च्या
मांसरक्ताच्या देहांमध्ये , तुम्हांला कशाही प्रकारच्या बदनामीच्या देखील, खूपच वरचे स्थान आपल्या दृष्टीत दिले आणि
तुम्हांस पवित्र व निर्दोष असे सादर (प्रस्तुत) करण्यासाठी आत्ता तुमच्याशी समेट (मेळ) केलेला आहे. 23 जर तुम्ही
विश्वासात स्थिरावलेले, मुळावलेले आणि जी येशू-वार्ता तुम्ही ऐकली आहे, तिची आशा बाळगणारे आहा, या
आकाशाखालील प्रत्येक प्राण्याला जी आशा दिली गेलेली आहे त्याच आशेचा मी पौल सेवक झालो आहे.
24 आतां मी त्या दुःखांखातर (छळ) आनंदी आहे जी मला तुमच्यासाठी होतात; व ख्रिस्तांच्या दुःखातील (छळ) जे
कांही उरले (शिल्लक) आहे ते ख्रिस्तांचा देह अर्थात त्यांच्या चर्चसाठी स्वत:च्या देहाठायी पूर्ण करून देतो आहे.
25 तुम्ही जे गैरयहूदी आहा त्या तुम्हांला आपला संदेश (वचन) विपुलतेने देण्याच्या कार्यांद्वारे, परमेश्वराने मला चर्चची

सेवा करण्याची जवाबदारी (कार्यभार)दिलेली आहे. [26] असे त्या रहस्यामुळे आहे, जे युगानुयुगापासून लपलेले (गुप्त)
असे होते, पण आता मात्र ते त्याच्या पवित्र लोकांवर प्रगट झाले आहे. [27] परमेश्वरास सांगण्याची इच्छा झाली की त्याने
कळवावे, की गैरयहूदीयांमध्ये बहुमूल्य (किमती) महिमामय रहस्य काय (कोणले) आहे! ते रहस्य हेच आहे की
मशीहा- ख्रिस्त, जे महिमेची आशा आहेत, आमच्याठायी वास (निवास) करतात. कारण हे एक गुपित (रहस्य) आहे:
येशू तुमच्यांठायी आहेत व तुम्हांला तसा भरंवसाही (शाश्वती) आहेच की तुम्ही त्यांच्या महिमेचे भागीदार (हिस्सेदार)
असालच.

[28] प्रत्येक व्यक्तिला (परमेश्वरापुढे) ख्रिस्त येशूंठायी (त्यांच्याशी असलेल्या त्याच्या नात्यांसह) सिद्ध असे उभे करिता
(उपस्थित) यावे, म्हणूनच आम्ही उपदेश करितो आणि चेतावणी देतो (सावध करितो),व सर्व ज्ञानासह, प्रत्येक
माणसाला शिकवितो. [29] हेच लक्ष्य असल्यामुळे, त्यांचे सामर्थ्य जे माझ्या ठायी संपूर्ण शक्तिने कार्य करीत आहे, मी
तनमन लावून खूप प्रयत्न (धडपड) करितो.

## 2

[1] ज्या लोकांनी माझे तोंड पाहिले नाही आणि जे लावदिकीयांत आहेत, त्यांच्यासाठी मला किती अधिक संघर्ष करावा
लागतो आहे, हे त्यांना सांगावयाचे आहे. [2] ज्ञानाच्या पूर्ण आश्वासनाची संपत्ति आणि परमेश्वर पिता व येशू ख्रिस्तांच्या
रहस्याच्या पूर्ण ज्ञानात तुम्हांला प्रवेश करिता येणे शक्य व्हावे म्हणून, तुम्ही एकमेकांबरोबर प्रेमाने घट्टपणे एकत्र जोडले
(बंधन) जाऊन आपल्या मनांत प्रोत्साहन प्राप्त करीत जावे. [3] येशू ख्रिस्तांमध्ये बुद्धि आणि ज्ञानाचा संपूर्ण खजिना
लपलेला (गुप्त) आहे. [4] तुम्हांला कोणीही लबाडीपूर्ण (फसवणूक) शब्दांनी धोका देऊ नये म्हणून हे सांगतो आहे. [5] जरी
मी देहाने (दैहिकरित्या) तुमच्याबरोबर नसलो, तरीपण आत्म्याने मी तुमच्याबरोबर (जवळ) आहे; ख्रिस्तांठायी
असलेली तुमची मजबूत विश्वासाची स्थिरता आणि तुमच्यांत असलेले अनुशासन पाहून मी खुश आहे.

[6] यास्तव जसे तुम्ही प्रभू येशू ख्रिस्तांना स्वीकारले आहे, तसेच पुढे चालत रहा. [7] जसे तुम्हांला शिकविले गेले आहे
त्याप्रमाणे विश्वासात दृढ होऊन, खोलवर गेलेल्या मुळासारखे मजबूत व्हा, उपकारस्तुतीने गच्च भरून निरंतर धन्यवाद
करीत रहा, होय, असेच करीत रहा.

[8] ख्रिस्तांवर आधारित नसलेले, पण मनुष्याच्या परंपरेनुसार आणि जगाच्या मुलभूत (प्राथमिक) शिक्षणावर
आधारलेले तत्वज्ञान व पोकळ धोका, यांनी लुटून कोणीही तुम्हांला कवडी मोलाचे करू नये, म्हणून सावध असा.

[9] ख्रिस्तांठायीच परमेश्वराची संपूर्णता दैहिक रीतिने वास करिते (वसते). [10] येशू सर्व प्रभूसत्ता आणि अधिकाराचे शिर
(प्रमुख) आहेत, त्यांच्याठायी तुम्ही पूर्ण (विपुल) केलेले आहात. [11] त्यांच्यामध्ये तुमची अशी सुंता झालेली आहे जी
हातांनी होत नसते, ती तर ख्रिस्तांद्वारे केलेली आत्म्याची सुंता आहे, जिच्यामध्ये अपराधांचे शरीर हटवून दिले जाते.
[12] आणि तुम्ही बाप्तिस्म्याद्वारे ख्रिस्तांबरोबर पुरलेले आणि त्यांच्याठायीच परमेश्वराच्या सामर्थ्याद्वारे विश्वासात जिवंतही
उठविले गेला,

[13] ज्याने येशूंना मेलेल्यांतून जिवंत उठविलेले आहे. तुम्ही आपले अपराध व आपल्या दैहिक उणिवांत मेलेले
(मृतावस्थेत) होता, [14] ते सर्व अपराध क्षमा करून रचनाकार परमेश्वराने तुम्हांला येशूंबरोबर जिवंत केले आणि जो न्याय
(मोशेचे नियमशास्त्र) आपल्या विरूद्ध (प्रतिकूल) होता, [15] तो सर्व सर्व येशूंनी क्रूसावर खिळून टाकिला, आपल्यापासून
दूर केला आणि इतकेच केवळ नव्हे तर परमेश्वराने आपले सर्व अपराध पूर्णपणे काढून टाकिले. येशूंनी जागीर,
आधिपत्य, प्रतिष्ठा आणि सामर्थ्य लुटून (लुबाडून) घेतले;

[16] क्रूसाद्वारे त्यावर विजय प्राप्त करून येशूंनी त्या सर्वांना नागवून (नग्न) टाकिले आणि त्यांचा खुल्लमखुल्ला तमाशा
केला. यास्तव खाणेपिणे, सण साजरे करणे, [17] किंवा नवचंद्र अर्थात अमावस्या किंवा शब्बाथाविषयी कोणत्याही
दुसऱ्या व्यक्तिने तुमच्याकरिताचा निर्णय घेऊ नये (देऊ नका). [18] या सर्व बाबीं नंतर (भविष्यांत) होणाऱ्या गोष्टींची एक
छाया आहे; सर्वांत अधिक महत्वाची बाब (मुख्य सार) केवळ येशूंच आहेत. स्वतःठायी असलेली तुमची लीनता,

देवदूतांची उपासना, अदृश्य गोष्टी आणि 19 आपल्या शारीरिक मनाद्वारें, व्यर्थ गर्वाने फुगण्याद्वारे कोणीही तुम्हांला,
तुमच्या बक्षिसांपासून वंचित (मुकवूं) करू नये, आणि अशा प्रकारचा व्यक्ती चर्चचे मस्तक अर्थात येशूंना धरून राहत
नाही. येशूंमुळे संपूर्ण देहाचे (चर्च) सांधे व तंतूबंधनाद्वारे पोषण होऊन त्याची जोपासना केली जाते जो घट्टपणे एकत्र
जोडला जाऊन परमेश्वरापासून उन्नति (वृद्धि) प्राप्त करीत जातो.
20 कारण जर प्रारंभिक बाबींच्या संदर्भात, तुम्ही, ख्रिस्तांबरोबर मेला आहा, तर जगिक लोकांसारखे 21,22 त्या सर्व
विधी-नियमांचे गुलाम कां होता? “याचा स्पर्श करू नका, ते चाखू नका” अशा गोष्टी अमलांत आणू नका;
23 वस्तूंच्याविषयी ज्या विधी दिल्या गेल्या आहे कारण त्या, माणसांच्या आज्ञा व सिद्धांतानुसार आहेत,आणि
उपभोगानंतर नष्ट होणार आहेत. ज्ञान प्रदर्शन किंवा आपण निवडलेली एखादी भक्तीची विशिष्ट पद्धत, लीनता व देहपीडा
देण्याविषयी सांगावयाचे असेल तर, या सर्वांचे ‘दैहिक इच्छा व लालसा वश करण्याच्या दृष्टीने’ काहीही महत्व नाहीये.

# 3

1 तुम्ही ख्रिस्तांबरोबर जिवंत झाला आहा, म्हणून जेथे परमेश्वराच्या अधिकारांसह ख्रिस्त आहेत तेथील स्वर्गीक
गोष्टींची कामना (इच्छा) करा. 2 जगाच्या नव्हे तर स्वर्गाच्या वस्तूंकडे मन लावा. 3 कारण मागील (पूर्वीच्या)
जीवनाकरिता तुम्ही मेला आहा आणि ख्रिस्तांद्वारे, परमेश्वरामध्ये तुमचे स्वर्गीक जीवन गुप्त (लपलेले) असे आहे. 4 जेव्हा
ख्रिस्त जे आपले जीवन आहेत प्रगट होतील, तेव्हा तुम्ही देखील त्यांच्याबरोबर तेजोमय असे प्रगट व्हाल.
5 म्हणून पृथ्वीवर तुमच्याठायी असलेली शारीरिक लालसा, अर्थात यौन कामुकता (अनैतिकता), अशुद्धता, तीव्र
कामवासना, दुष्ट इच्छा आणि लोभ (जी मूर्तिपूजा आहे), ही सर्व मारून टाका. 6 याच कारणांनी स्वर्गीक पित्याची आज्ञा
मोडणाऱ्यांप्रत त्याचा क्रोध प्रगट होतो. 7 पूर्वी (एके समयी) जेव्हा तुम्ही या सर्व लालसांत जीवन जगत होता तेव्हा
आपला पूर्ण समय त्यांमध्येच व्यर्थ घालवीत होता. 8 परंतु आता मात्र या सर्व गोष्टी म्हणजे क्रोध, संताप, कटुता, निंदा,
मुखाने निघणाऱ्या वाईट गोष्टी तुम्ही स्वतःपासून दूर करावयास हव्या. 9 तुम्ही आपले जुने जीवन त्यांतील कर्मांसह
काढून फेकले (टाकले) आहे, म्हणून आता एकमेकांशी खोटे बोलू नका. 10 तुम्ही आता नव्या जीवनाची सुरूवात
केलेली आहे, आणि ते नवे जीवन परमेश्वराच्या समानतेच्या ज्ञानांत नवे होत जाते. 11 ज्यामध्ये ग्रीक -यहूदी, सुंता झालेले
व न झालेले, बारबेरियन-स्कुथी, गुलाम-स्वतंत्र असा भेदच (अंतर) नाहीये. ख्रिस्त सर्व गोष्टींमध्ये सर्वश्रेष्ठ आहेत आणि
ते आपल्या सर्वांठायी वास (राहतात) करितात.
12 म्हणून परमेश्वराने निवडलेल्या (वेगळे केलेले) लोकांसारखे असणाऱ्यांनो, पवित्र आणि अत्यंत प्रिय असलेल्या
लोकांनो, कोमल करूणा, मनाची लीनता, नम्रता आणि धीर यांनी आपल्या स्वतःला झाकून टाका. 13 जर एखाद्याशी
तंटा (भांडण) असेल तर एकमेकांचे सहन करा आणि क्षमा करा. ज्या प्रकारे ख्रिस्तांनी तुम्हांला क्षमा केली, त्याच प्रकारे
तुम्ही देखील आपसांत एकमेकाला क्षमा करावी. 14 या सर्व गोष्टींपेक्षा अधिक आपल्या स्वतःला प्रेमाने आच्छादून
(झांकून) टाका, कारण प्रेम सिद्धतेचा कमरबंद (पट्टा) आहे.
15 येशूंची शांति, जिच्याकरिता तुम्हांला या देहात निमंत्रण दिले गेले आहे, त्या शांतीने तुमच्या मनांठायी शासन करावे.
त्यांची उपकारस्तुति (आभार) नेहमी करीत रहा. 16 संपूर्ण ज्ञानासह आणि विपुलतेने, ख्रिस्तांचे वचन तुमच्यामध्ये कायम
वसलेले (दृढ़) असो, येशूंकरिता आपल्या अंतःकरणात गात चला आणि स्तोत्रें व परमेश्वरी गीतांद्वारे एकमेकाला
शिकवीत आणि उपदेश (समजावणे) करीत रहा. 17 बोलणे- चालणे आणि जे काही तुमच्याद्वारे केले जाईल, ते सर्व काही
प्रभू येशूंच्या नांवात आणि त्यांच्याचद्वारे, परमेश्वराची उपकारस्तुति करीत केले जावे.
18 पत्निंनो, आपआपल्या पतींची आज्ञा (आधीनतेत) पाळा, कारण येशूंना ते आवडते.
19 पतींनो, आपआपल्या पत्नींवर प्रेम करा, त्यांच्याबरोबर कोणत्याही कठोरपणाचा व्यवहार करु नका
20 मुलांनो, सर्व गोष्टींत आपल्या आईबापांच्या आज्ञांचे पालन करा, कारण त्यामुळे येशूंना आनंद होतो.
21 मुलेबाळें असलेल्यांनो, आपल्या मुलांना चीड येईल असा व्यवहार (प्रवृत्त होतील) करू नका, कारण त्यामुळे

त्यांनी आपली हिंमत गमावून बसावे असे होता कामा नये.
22 सेवकांनो, जगिकरीतिने जे तुमचे मालक (स्वामी) आहेत,, त्यांच्या प्रत्येक गोष्टीत, त्यांच्या आदेशाचे पालन करा;
लोकांना दाखविण्यासाठी किंवा त्यांना (लोकांना) प्रसन्न करण्यासाठी नव्हे, परंतु अंतःकरणाच्या प्रामाणिकपणाने
स्वर्गीक पित्याचे भय राखून तसे करा. 23 जे काही तुम्ही करिता ते नीट मन लावून, या जाणीवेने करा की लोकांसाठी
नव्हे परंतु येशूंसाठीच ते करीत आहा. 24 तुम्ही येशू ख्रिस्तांची सेवा करीत आहा म्हणून पक्के समजून आणि जाणून घ्या,
की तुम्हांला वतनरूपी बक्षिस येशूंपासूनच मिळेल. 25 परंतु जो व्यक्ती चूक (दुष्टतेने) वागेल तो आपल्या दुष्टाईचे
(अयोग्य कार्य) परिणाम सहन करील कारण परमेश्वर लोकांबरोबर पक्षपात करीत नाही.

# 4

1 मालकांनो स्वर्गात तुमचा एक स्वामी आहे, याचे स्मरण बाळगून आपल्या सेवकांना योग्य ती मजूरी द्या.
2 उपकारस्तुतिसह प्रार्थनेंत संपूर्ण मनाने लागलेले असा व सतर्कतेने जागृत रहा. 3 ख्रिस्तांचे रहस्य आणि वचन
यांसाठी स्वर्गीक पित्याने एक दार उघडावे अशी आमच्यासाठी विनंती करा. याच वचनाच्या सेवेस्तव मी बंधनांत
(कैदी) आहे, 4 व ते केवळ यासाठीच की जसे वचन (संदेश द्यावा)मला बोलले पाहिजे, ते स्पष्टरीतिने बोलणे मला
बोलता यावे. 5 वेळेचा सदुपयोग योग्यसा करा आणि बाहेरच्या लोकांशी बुद्धमानीने (शहाणपणाने) वागा. 6 तुमचे बोलणे
सदैव गोड असावे, ते कृपेने भरलेले असावे जेणेकरून लोकांना योग्य उत्तर कसे द्यावे हे तुम्हांस नीट जमवून घेता यावे.
7 माझ्याविषयी तुखिक तुम्हांला खबरबात (समाचार) देईल. ख्रिस्तांमध्ये असलेला तो एक सज्जन भाऊ आणि
माझ्याबरोबर काम करणारा विश्वासयोग्य असा सेवक आहे. 8 तुम्ही कसे आहां (सद्य परिस्थिती) हे त्याने जाणून घ्यावे
आणि तुमची हिंमत वाढवावी, याच हेतूने मी त्याला तुमच्याकडे पाठविले आहे. 9 अनेसिम विश्वसनीय आणि प्रिय भाऊ
आहे,त्याला देखील सोबत पाठविले आहे आणि तो तुमच्यांतलाच आहे. तेच तुम्हांला येथे घडणाऱ्या सर्व गोष्टींचे
वर्तमान सांगतील.
10 अरिस्तार्ख माझ्या सोबतीचा कैदी आणि मार्क (ज्याच्याविषयी तुम्हांला कळविले गेले) जो बर्णबाचा भाऊ आहे,
सलाम सांगतात. मी तुम्हांला कळविले होते, की मार्क जर तुमच्याकडे आला तर त्याचे स्वागत करा. 11 येशू जो युस्त
म्हटला जातो, तुम्हांला सलाम सांगतो आहे. हे तिघेही यहूदी मतांतून आलेले आहेत ज्यांनी स्वर्गीक पित्याच्या
राज्यासाठी प्रामाणिकपणाने परिश्रम केले आहेत - होय, ते अशाप्रकारचे लोक आहेत, ज्यांच्याद्वारें माझे सांत्वन होते.
12 एफफ्रास देखील, जो तुमच्यांतील एक, आणि ख्रिस्तांचा सेवक आहे, सलाम सांगतो. तुम्ही परमेश्वराच्या इच्छेनुरूप
संपूर्ण प्रकारे स्थिर रहावे म्हणून तो सदैव मोठ्या तत्परतेने व कळकळीने प्रार्थना करीत असतो. 13 त्याच्याविषयी मी
साक्षी आहे की लावदिकीया व हेरापलींतील लोकांसाठी त्याच्यात प्रचंड उत्साह (रमलेले अंतःकरण) आहे. 14 प्रिय
चिकित्सक लूक व देमास तुम्हांला सलाम सांगतात. 15 ते भाऊ जे लावदिकीयांत आहेत आणि नुंफा आणि तिच्या घरी
जमणारे चर्च यांनाही सलाम सांगा.
16 हे पत्र तुमच्यांत वाचून झाल्यानंतर, ही गोष्ट ध्यानात असू द्या, की लावदिकीयाच्या चर्चमध्ये देखील ते पत्र वांचून
ए‍ेकविले जावे आणि अशाच प्रकारे लावदिकीयांला लिहिलेले पत्र तुम्ही देखील वांचावे.
17 आर्खिप्पाला सांगा, की त्याने येशूंकडून मिळालेली सेवा पूर्ण करावी.
18 हे अभिवादन (सलाम) मी पौल, स्वतः आपल्या हाताने लिहीत आहे. माझ्या साखळयांचे स्मरण असू द्या.
तुमच्यावर दया (कृपा) असो. होय, असेच व्हावे.